संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह निमित्त इर्विन चौक येथे दुर्मीळ छायाचित्र प्रदर्शनी व पथनाट्याचे सादरीकरण

अमरावती.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह निमित्त इर्विन चौक येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याचा प्रवास दुर्मिळ छायाचित्रांच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या स्टॉल मध्ये सादर करण्यात आला. त्याचे उद्घाटन अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री प्रविणभाऊ पोटे यांचे शुभहस्ते करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक, डॉ. जे.डी. वडते, मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, उपकुलसचिव श्री प्रवीण राठोड, सिनेट सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई, डॉ. रविंद्र सरोदे, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष, श्री अजय देशमुख, विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष, डॉ. नितीन कोळी, रासेयो प्रभारी संचालक, डॉ. राजेश मिरगे, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. सचिन गायकवाड, डॉ. मंदा नांदुरकर आदिंची उपस्थिती होती.

यावेळी विद्यापीठाद्वारे संविधान उद्देशिका व विद्यार्थी हितार्थ योजनांच्या माहिती पत्रकाचे प्रकाशन सुध्दा मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. आंबेडकरी चळवळीतील नेत्यांनी आणि बाबासाहेबांना अभिवादन करण्याकरिता जमलेल्या सर्व नागरिकांनी बाबासाहेबांच्या जीवन कार्यावरील दुर्मिळ छायाचित्रांचे अवलोकन करुन माहिती जाणून घेतली. यावेळी उद्देशिका व विद्यार्थी हितार्थ योजनांच्या माहिती पत्रकाचे वितरण सर्वांना करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे (बार्टी) च्या सौ. अनिता राऊत व संचाने यावेळी महान तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदीर प्रवेश, जातीअंत व्यवस्था, शिक्षण, धर्मांतरण आदी विषयांवर पथनाट्यातून प्रकाश टाकून लोकांमध्ये जनजागृती केली. पथनाट्य व कार्यक्रमाचे आयोजनासाठी रासेयोचे संचालक डॉ. राजेश मिरगे, प्रा. सचिन गायकवाड, प्रा. प्रेमानंद तिडके, श्री राजेश पिदडी, आदिंनी परिश्रम घेतले.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १६/०४/२०१८.
दै............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी